# मलेरिया फाउन्डेशन

## इन्टरनॅशनल

*जगभर माणूसकीला जवळ करणारे*

आमचे प्रेषणकार्य हिंवतापामुळे उद्भवलेल्या आरोग्य, आर्थिक आणि सामाजिक प्रश्नांवरच्या निरसनांचा विकास आणि अंमलबजावणीला मदत करणे हे आहे.



### नेतृत्वाचा विकास

चर्चेसाठी एक वातावरण तसेच हिंवतापाविरुद्ध लढताना वापरलेल्या मार्गांची विभागणी आणि वाटाघाटी उपलब्ध करून देण्याकरता एमएफआय जागतिक नेते आणि भागीदाऱ्या यांचे संवर्धन करते. आमच्या कामाच्या जाळ्यांमध्ये विद्यार्थी, शिक्षक, शास्त्रज्ञ, औद्योगिक आणि जमातींचे नेते यांचा समावेश आहे.



### जमातींचे शिक्षण

जमातींमधील नेत्यांना आणि मुलांना शिक्षण आणि समर्थन देण्याच्या प्रयत्नांना एमएफआय उत्तेजन देते. हिंवतापाच्या स्थानिक भागांमध्ये आमचे कार्यक्रम जमातींकरता विशेष संबंध आणि संधी उपलब्ध करून देतात. दरम्यान, ज्या देशांमध्ये हिंवताप नाही तेथील मुले या रोगामुळे झालेल्या हानीप्रत्ये संवेदनाशील बनतात.



### हिंवतापाबद्दल जागरूकता

१९९२ पासून एमएफआयने हिंवतापाविरुद्ध जागतिक स्तरावर प्रयत्न करण्याच्या गरजेकडे लक्ष वेधले आहे. मुख्य सिद्धी आहेत: हिंवतापाबद्दलचे पहिले बहुसमावेशक संकेतस्थळ सुरू करणे, प्रथम हिंवताप जागरूकता वृत्तपत्र साहित्याचा विकास, हिंवतापाच्या वाहक प्रतिबंधामध्ये डीडीटीच्या मर्यादित वापराचे समर्थन आणि आर्टेमिझिनीन-आधारित एकत्रित उपचार (एसीटी) याचा वापर करण्यात जागतिक स्तरावरच्या मुख्य बदलाला मदत करण्यात पुढाकार.






### संशोधनाचे समर्थन

हिंवताप हा टाळता येण्यासारखा आणि उपचार करता येण्यासारखा रोग असल्याकारणाने नवी परिणामकारक औषधे आणि लसीचा विकास आणि अंमलबजावणी करण्यासाठी एमएफआय शास्त्रज्ञ संशोधनाचे समर्थन करतात.

## आम्ही कोण आहोत

मलेरिया फाउन्डेशन इन्टरनॅशनल (एमएफआय) हे डॉ. मेरी आर. गालिन्स्की यांनी १९९२ साली स्थापले. हिंवतापाचे संशोधक आणि विविध व्यवसायांमधील तज्ञांची बांधीलकी आणि समर्पण यासमवेत हिंवतापाच्या परिणामकारक प्रतिबंध, उपचार आणि अटकावाला वाहिलेली एक खासगी संस्था स्थापण्यासाठी योजना केल्या गेल्या. या प्रयोजनामध्ये जोडलेल्या बहुसंख्य व्यक्ती आणि गटांबरोबर एमएफआय काम करते.

### नवीनतम जागतिक कार्ये



हिंवतापाचा नाश करा – निळी फीत मोहीम. अमेरिकन सोसायटी ऑफ ट्रॉपिकल मेडिसीन ऍन्ड हायजीन च्या अटलान्टा मधील २००६ च्या वार्षिक सभेमध्ये सुरू झालेली हिंवतापाचा नाश करा – निळी फीत ही हिंवतापाविरुद्ध लढण्याच्या जगाच्या समर्पण आणि बांधीलकीसाठी एक ग्रास रूट्स चिन्ह बनत आहे.

SLAM

हिंवतापाविरुद्ध विद्यार्थी नेते. स्लॅम हा एक विद्यार्थ्यांना हिंवताप समजण्यासाठी आणि त्याच्याविरुद्ध लढा देण्याच्या कामाला लावण्यासाठी तयार केलेला कार्यक्रम आहे. २००५ पासून स्लॅमचे मुख्य प्रकल्प अमेरिका, आफ्रिका आणि आशियामध्ये विकसित होत आहेत.

MARTIAL ART INTERNATIONAL CHOI KWANG DO

चोई क्वां दो मार्शल आर्ट इन्टरनॅशनल. हिंवतापाविरुद्ध लढण्यात मदत करण्यासाठी सीकेडी एमएफआयबरोबर एकत्र काम करत आहे. अमेरिका आणि इंग्लंडमधील सीकेडी शिक्षक आणि विद्यार्थी हिंवतापाबद्दल जागरूकता, शिक्षण आणि आर्थिक विकासाचे पुरस्करते झाले आहेत.

MBLC

हिंवताप औद्योगिक नेतृत्व परिषदा हिंवताप तज्ञ, औद्योगिक आणि जमातींच्या नेत्यांना हिंवतापाची कठोर वस्तुस्थिती समजण्यासाठी आणि एका रोगाविरुद्ध लोकांचा एक भिन्न गट एकत्रितपणे कसा काम करू शकतो हे समजण्यासाठी एकत्र आणतात.



हिंवताप पुरस्कार समारंभ. २००६ मध्ये सुरू झालेले एमएसी हिंवतापाविरुद्ध लढणाऱ्या असंख्य नेते आणि माहीत नसलेले नायक, ज्यामध्ये शिक्षक, विद्यार्थी, शास्त्रज्ञ, पत्रकार, औद्योगिक नेते, प्रसिद्ध व्यक्ती आणि राजकारणी यांचा समावेश आहे, यांना मान्यता देते.

**एमएफआय च्या सध्याच्या कार्यक्रमांच्या अधिक माहितीसाठी कृपया आमच्या संकेतस्थळाला www.malaria.org भेट द्या किंवा MFI@malaria.org येथे आमचा संपर्क साधा.**

हे भाषांतर **www.worldvoicecenter.com** यांनी केले आहे

जून २००९